संस्कार - काळाची गरज

पूर्वीचा काळ हा नातेसंबंध जपणारा काळ होता.मनामध्ये इतरां विषयी आपुलकी आणि जिव्हाळा कायम जिवंत असायचा.मनामध्ये निस्वार्थ भावना ठेवून एकमेकांना आधार देणारे असे आपले पूर्वज होते आणि तेच भाव आपले आई वडिल टिकवून ठेवत आहेत.आपल्या आई वडिलांना संयुक्त कुटुंब पद्धती आवडत असे.मुलीसाठी स्थळ पाहताना खटल्याचं घर (एकत्रित कुटुंब) पाहत असे.समाजात राहून समाजाशी एकरूप होणारी अशी ही माणसे आहेत.पूर्वी १५-१५ दिवस चालणारे लग्न सोहळे असायचे आणि सर्वजण त्या आनंदात स्वखुशीने सहभाग घेत असे.आप्तेष्टही मनसोक्त राहायचे आणि जो पर्यंत ते राहतील तो पर्यंत यथेच्छ पाहुणचार चालायचा.वाहतुकीची आज जशी पर्याप्त व्यवस्था आहे तशी त्यावेळी नक्कीच नव्हती तरीही सर्व आवर्जून उपस्थित राहायचे.शुभ कार्याला तन,मन आणि धनाने हातभार लावून कार्य पूर्णत्वास नेत असे.

ग्रामीण भागात आजही अशी मानसिकता असणारे भरपूर लोकं पाहायला मिळतात.सुखात सहभागी होण्याचा आनंद होताच परंतु दुखामध्ये सुद्धा तेवढ्याच आपुलकीने धावून जात असे.एखाद्या गरजू व्यक्तीला मदत करताना कसलाच मोठेपणाचा आव नसायचा.सहजपणे मदत करणारे हात आणि वेगाने धावून येणारे पाय कोणालाही दुःखात राहू देत नसे. चेहरा पाहून दुःख ओळखणारे ते लोक आता हरवत चालले आहेत.घरातील सदस्या एवढीच शेजारच्या माणसांची काळजी घेणारे आपले आई वडील आता शेजारीचं कुणी नसल्याने एकटे पडले आहेत.चालता फिरता विचारपूस करताना नकळत माणसाची मानसिक अवस्था वाचता येते अशी त्यांची समज होती.

आपल्या पालकांनी अनमोल संस्कार आपल्या पर्यंत जश्याच तसे पोहोचावे यासाठी भरपूर प्रयत्न केले.लहानपणापासून सर्वांचा आदर करणे,प्रेमाने बोलणे,मोठ्यांना चरणस्पर्श करून आशीर्वाद घेणे,आवाज दिल्या बरोबर कुणाच्याही मदतीस कामी येणे,आजी आजोबाची सेवा करणे ही त्यांची शिकवणून आपल्या पर्यंत मिळाली.आपण सुद्धा पुढच्या पिढीला तिच शिकवणूक देण्याचा प्रयत्न करतो आहोत.

आजची परिस्थिती खूपच वेगळी आहे.सभोवताली एक नजर फिरवली तर लक्षात येतं तो बंधुभाव आणि आपुलकी लोप पावत चालली आहे.नात्यांमधील संवाद संपत चालला आहे.आपणही कधीतरी सहजच बोलून जातो येणारा काळ अवघड असणारं परंतु याला अवघड करून ठेवणारे सुद्धा आपणच आहोत हे कुणी समजून घेत नाही.मुलांना ज्या वयात समज येऊ लागते त्या अगोदर पासून शैक्षिणक कारणासाठी त्यांना बाहेर ठेवण्यात येत आहे.यातून ते प्रगत होत आहेत यात काहीच वाद नाही पण त्यांच्यात नात्यामधील आपुलकी आणि जिव्हाळा राहत नाही.एवढंच काय तर रक्ताची नाती सोडून इतर नाते त्यांना समजतचं नाही.यासाठी काही प्रमाणात आपणही जबाबदार आहोत.

सवड पाहून आवड निर्माण करणारे आपण घड्याळाच्या तालावर नाचू लागलो आहोत.निमंत्रण पत्रिकेत दिलेल्या वेळेवर पोहोचून अगदी मोजका वेळ देत आपण औपचारिकता पाळत आहोत.आपण आलेल्या निमंत्रण पत्रिकांना प्राथमिकता देताना सहसा जास्त जवळचा या ऐवजी जास्त कामी येणारा असा क्रम लावतो. आपले स्टेटस जपताना आपण केवळ कार्यक्रमास उपस्थिती लावणेचं पसंत करतो बाकी आपल्याला कोणत्याच गोष्टीचे काही देणे घेणे नसते.हे झालं बाहेरच्या साठी परंतु घरचे सर्व सदस्य निवांत एक ठिकाणी बसून मनसोक्त गप्पा कधी केल्या हे आठवत सुद्धा नसेल.मित्रांबरोबर हसून खेळून गेलेला काळ पुन्हा कधी जगता येईल याची अपेक्षा केली जात नाही.आपण हे सर्व करताना एक प्रमुख गोष्ट विसरत आहोत की आपले अनुकरण आपली मुले करत असतात.

आजची पिढी अनुकरणातून शिकत जाणारी असल्याने आपण त्यांच्या समोर जसे दिसतो तसेच ते वागण्याचा प्रयत्न करत असतात. आज आपण जे आपल्या आई वडिलांसोबत करतोय तेच आपल्या भावी पिढी कडून आपल्याला परतावा म्हणून मिळणार आहे हे नक्कीच.आपल्या पालकांनी जे संस्कार देऊन आपल्याला मोठं केलं तेच जर आपल्या मुलांमध्ये असावे असं वाटत असेल तर काही गोष्टी आपल्याला बदलाव्या लागतील. उच्च शिक्षण घेऊन नामांकित कंपनीत नोकरी करताना आपण बऱ्याच वेळा मनात असताना पण कुटुंबासाठी वेळ देऊ शकत नाही.मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आपण पैसे मोजून खूप काही करायला पाहतो परंतु संस्कार हे पैशाने विकत घेता येत नाहीत तर ते कृतीतून दाखवून पुढे हस्तांतरित करावे लागतात.

मुलांना घडवतांना आपण जर पुढील बाबींना जीवनात महत्त्व दिलं तर नक्कीच अपेक्षित बदल दिसू लागतील.कुटुंबासाठी वेळ देता आला पाहिजे जेणे करून आपल्या सोबत मुलेही त्यांच्यात छान रमतील.स्वतः सर्वांची विचारपूस करत राहिली पाहिजे म्हणजे मुले आपल्या माघारी त्यांना प्रेम देत राहतील.

आपले भावंडं आणि नातेवाईक यांना गरजेच्या वेळी मदत केली की मुलांमध्ये त्यांच्या बद्दल जिव्हाळा निर्माण होऊन नात्याचं महत्त्व समजू लागेल.घरातील मोठ्या माणसांना योग्य आदर दिला तर मुलं मोठ्यांची घरात असणारी किंमत समजू शकतील.त्याच बरोबर सर्व सदस्य एक सोबत बसून जेवण करणे,सण साजरे करणे,घरगुती कार्यक्रम जसे की वाढदिवस,लग्नाचा वाढदिवस साजरा करणे यातून संवाद वाढतो. नोकरी निमित्त आपण जर बाहेर राहत असू तर अधून मधून मुलांना फोटो अल्बम काढून सर्वांचा वारंवार परिचय देत राहणे कारण जर एखादे जवळचे नातेवाईक बऱ्याच दिवसानंतर समोर आले तर त्यांना अगदीच नवीन चेहरा पाहिल्या सारखे वाटू नये.आज्जी आजोंबांसोबत भरपूर वेळ घालवू देणे.महापुरुष व महात्मा यांचे चरित्र सांगणे अश्या छोट्या छोट्या गोष्टी पासुन आपण मुलांमध्ये योग्य बदल घडवू शकतो जेणे करून ते उच्च शिक्षणा सोबत उच्च संस्कारित म्हणून समाजात वावरतील.

माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजात वावरताना अनेक नात्यांच्या नाजुक बंधात तो बांधला जात असतो.प्रत्येक माणसाची आपल्या जीवनात एक किंमत असते.आपण मोठं होताना अनेकांचा सहभाग आपल्याला यशाच्या पायऱ्या चढताना कारणीभूत ठरतात.वरील सर्व भाव हे सहजपणे अंगीकारले तर समाजात आपलं उच्च व्यक्तिमत्त्व निर्माण करण्या मध्ये नक्कीच सहायक ठरेल.मोठ्यांच्या शिकवणुकीचे आपल्या जीवनात अनन्य साधारण महत्व आहे आणि त्याच शिकवणुकीला पुढच्या पिढीला प्रेरणादायी म्हणून ठरवण्यासाठी हवा तो बदल करूया आणि येणारा काळ सुंदर बनवूया.

पवन श्रीरंगसा कुसुंदल, नांदेड
संपर्क:९०७५५९५६९५

भोर तालुक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती मोठ्या उस्ताहात साजरी

भोर - भोर शहरासह ग्रामीण भागात विविध उपक्रमांचे आयोजन करत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची ११३ वी संयुक्त जयंती उस्तव मोठ्या उस्ताहात साजरी करण्यात आली. भोर शहरातील एस टी स्टँड जवळील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी शहरासह ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने जनसागर लोटला होता.

सालाबादप्रमाणे या वर्षीही भारतीय बौद्ध महासभाच्या सर्व पदाधिकारी, समता सैनिक दलचे पदाधिकारी,आंबेडकरवादी युवा तसेच सर्व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, सर्व पक्षीय जाती धर्मातील कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन अभिवादन केल्याने यावर्षी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या विस्तार वाढल्याचे चित्र दिसून आले. ही बाब सामाजिक सलोख्यासाठी स्वागताहार्य असून महापुरुष जाती धर्माच्या भिंतीत अडकू शकत नाहीत हा विचार यंदाच्या जयंतीमुळे समाजात रुजला असल्याचे चित्र ह्यावेळी दिसत होते.

यावेळी सकाळी नऊ वाजता आंबेडकरवादी युवा यांच्या वतीने

भोर शहरातील चौपाटी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरुढ पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करुन चौपाटी ते एसटी स्टँड जवळील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत फटाक्याच्या आतिषबाजीत हजारो अनुयायांच्या उपस्थितीत भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली ती मंगळवार पेठ मार्गे एसटी स्टँड जवळील महापुरुषांच्या पुतळ्याजवळ येऊन थांबली. यावेळी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो च्या जयघोषाने परीसर दणाणून गेला होता तर डिजेच्या तालावर तरुणाई थरारली होती.

यावेळी तालुक्यातील सर्व आंबेडकरी चळवळीतील पक्ष,संघटना, यांच्या वतीने सामुदायिक बुध्द वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

एसटी स्टँड जवळील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील परीसरात आलेल्या जनसागराला आंबेडकरवादी युवाच्या कार्यकर्त्यांकडून एक हजार सविंधान प्रास्ताविकाच्या प्रती व फुले, शाहू, आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा पुस्तकाचे वाटप करण्यात आले. व शहर परीसर स्वच्छ करण्यासाठी मोलाचे योगदान करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला त्यानंतर आलेल्या जनतेला जेवण व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी भोर तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभाचे अध्यक्ष रामभाऊ रणखांबे, आनंदा गायकवाड, सतीश गायकवाड, अनिता हांडे, संध्या गायकवाड, सरपंच रुपाली जाधव, श्रमिक ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष संतोष जाधव, रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष सतीश अडसूळ, बौद्धजन संघचे अध्यक्ष महेंद्र सपकाळ,आंबेडकरवादी युवाचे मयूर गायकवाड, नितीन माने, रणजित रणखांबे, अरुण रणखांबे, प्रकाश ओव्हाळ, आकाश गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते,अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उमेश भाऊ पाटील मित्र परिवाराकडून तळेगाव ते चोपडा एसटी बस सेवा सुरू

राजगुरूनगर (वा.) : खानदेश विकास युवा मंच उमेश भाऊ पाटील मित्र परिवार तळेगाव दाभाडे (पुणे) यांच्या विशेष प्रयत्नातून तळेगाव ते संगमनेर मार्गे चोपडा ही एसटी बस सेवा सुरू करण्यात आली आहे. राजगुरूनगर मधील खान्देश मित्र परिवार बांधवांनी नवीन सुरु झालेल्या बसचे चालक व वाहक यांचा सत्कार करून बसचे जल्लोषात स्वागत केले.

वडगाव मावळ, तळेगाव, पिंपरी चिंचवड, चाकण व राजगुरूनगर येथे खान्देशातील विविध क्षेत्रातील कामगार, विविध क्षेत्रातील अधिकारी, व्यावसायिक अनेक

वर्षांपासून वास्तव्यास आहेत. सुट्टीच्या काळात, सणासुदीला व यात्रेनिमित्त गावी जायचे असेल तर खान्देशातील प्रवाशांना खुप त्रास सहन करावा लागत असे शिवाय बसमध्ये बसायलाही जागा मिळत नसे. खानदेश विकास युवा मंच व उमेश भाऊ पाटील मित्र परिवार तसेच चाकण व राजगुरूनगर येथील अनेक प्रवाशांची तळेगाव ते संगमनेर मार्गे चोपडा या एसटी बसची मागणी होती. खान्देशवासियांची अनेक वर्षांची मागणी राज्य परिवहन मंडळाने मंजूर केली. तळेगाववरून चोपडा या नियमित बस सेवेचा प्रारंभ रविवार दि.१४ पासून झाला असून तळेगाव वरून रोज सकाळी ही गाडी सकाळी ६:३० वाजता सुटणार असून पहिल्याच दिवशी या बसची सहा हजार रुपयापेक्षा पेक्षा जास्त रुपयांची तिकीट विक्री झाली असून लवकरच या मार्गावर शिवशाही बस सुरु होईल अशी अपेक्षा शशिकांत खलाने व रामदास सैंदाणे यांनी व्यक्त केली.

राजगुरूनगर येथे शशिकांत भाऊ खलाणे मित्रपरिवार व खान्देश मित्र परिवारातर्फे बसचे चालक युवराज जोशी व वाहक राहुल अहिरे यांचा ज्येष्ठ विधिज्ञ पोपटराव तांबे व प्रा. बापूसाहेब चौधरी यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी किरण देवरे, उमेश भाऊ पाटील, सदाशिव आमराळे, दत्तात्रय दगडे, दीपक आहिरराव, अशोक माळी, प्रवीण कोळी, पंकज शिंदे, गोकुळ महाजन, गोकुळ भामरे, योगेश सैंदाणे, बाबासाहेब ढोकचौळे, राजुभाऊ पान पाटील, वैभव सातकर, योगेश वाघ,भगवान भाऊ, हृषीकेश अहिरराव, शरद सोनवणे, संदीप सूर्यवंशी, व सर्व खान्देश बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

कुरुंदवाड अर्बन बँक ६९ वर्षाची विश्वासनीय परंपरा कायम

कुरुंदवाड : येथील स्वातंत्र्य सेनानी श्रीपाल आलासे काका अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेस चालू आर्थिक वर्षात चार कोटी ४३ लाख इतका ढोबळ नफा झाला असून बँकेचा एनपीए 0% इतका आहे कुरुंदवाड अर्बन बँक ने ६९ वर्षाची विश्वासनीय परंपरा कायम राखत सभासद व ग्राहकांच्या विश्वासाला कुठेही तडा न जाऊ देता प्रगतीची घोडदौड कायम ठेवली आहे अशी माहिती बँकेचे चेअरमन प्रदीप पाटील माजी चेअरमन अरुण आलासे महाव्यवस्थापक शांतिनाथ कनवाडे यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली.

अधिक माहिती देताना ते म्हणाले भाग भांडवलामध्ये दोन कोटी नऊ लाख आणि वाढ होऊन भाग भांडवल १४ कोटी २५ लाख इतके झाले आहे ४१ कोटी ५७ लाख इतका झाला आहे ठेवीदारांनी बँकेवर दाखवल्या विश्वासामुळे वर्षा अखेर बँकेच्या एकूण ठेवी ३५२ कोटी ४९ लाख इतक्या झाल्या आहेत बँकेने विविध प्रकारची एकूण २१८ कोटी तीन लाख इतकी कर्ज दिली असून कमी व्याजदराच्या अनेक योजना उपलब्ध सभासदांना करून दिले आहेत रिझर्व बँकेच्या नियमानुसार वर्षाखेर बँकेने सरकारी कर्जरोखे व इतर बँकांमध्ये १४४ कोटी ५६ लाख इतकी गुंतवणूक केली आहे कर्मचारी सभासद व अधिकारी यांनी सहकार्य केल्यामुळे बँकेचा एनपीए 0% इतका झाला आहे सी आर ए आर भांडवल पर्याप्त रिझर्व बँकेच्या निर्देशाप्रमाणे बारा टक्के ठेवणे आवश्यक असते मात्र बँकेने १२.९९% इतका ठेवला आहे यावरून बँकेची आर्थिक भक्कम परिस्थिती दिसून येते

चालू अहवाल सालात चार कोटी ४२ लाख ९६ हजार इतका ढोबळ नफा झाला असून रिझर्व बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे सर्व वैज्ञानिक तरतुदी वजा करता बँकेत निवड नफा २कोटी ८२ लाख इतका झाला आहे सध्या बँकेच्या विष शाखा कार्यरत असून यापैकी सहा शाखांचे कामकाज बँकेच्या स्व मालकीच्या इमारतीत चालू आहे या सर्वांचाच एनपीए 0% आहे

बँकेने नेहमीच शेतकरी हा केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना त्याबरोबर व्यवसाय उद्योग घर बांधकाम खरेदी वैद्यकीय व्यवसाय जनावर गोठा जनावरे शेळी मेंढी पालन कुक्कुटपालन दुग्ध व्यवसाय मत्स्य शेती वनशेती शेती आधारित उद्योग काढणीपश्चात तंत्रज्ञान शाश्वत शेती गटशेती व फार्मर प्रोडूसर कंपनी स्थापन करून शेतकऱ्यांना उद्योजक बनवण्यासाठी कमी व्याजदराच्या अनेक योजना राबवल्या आहेत तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास मंडळ या मार्फत तरुणांना व्याज परतावा योजनेअंतर्गत वैयक्तिक व्यवसायासाठी१० लाख रुपये व ग्रुप व्यवसायासाठी ५० लाख रुपये योजना राबवलेल्या आहेत अशी माहिती शेवटी त्यांनी दिली

या पत्रकार परिषदेस व्हाईस चेअरमन सुधाकर पाटील संचालक मोनाप्पा चौगुले एडवोकेट सचिन कटारे नंदकुमार पाटील इकबाल पटवेगार अण्णासो जोंग सूर्यकांत कुसनाळे सुनील जनगोंडा पाटील सौ दिपाली पाटील सौ रेशमा इकबाल पाटील निखिल आलासे भरत चौगुले भगवान गायकवाड ज्येष्ठ संचालक महादेव धनवडे यांनी आभार मानले

त्र्यंबकेश्वर तालुक्यात वादळी पावसामुळे आंबा बागांचे नुकसान

नाशिक : सोमवारी संध्याकाळी वादळी पावसामुळे आंबा फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्र्यंबकेश्वर तालुक्यातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. यावर्षी वातावरणातील बदलामुळे आधीच आंबाबागांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना प्रयत्न करुन त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ३० ते ४० टक्के बागा वाचविण्यात यश आले होते. सोमवारी संध्याकाळी जोरदार वाऱ्यासह पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात कैऱ्या गळून पडल्या. हरसूलसह ठाणापाडा, निरगुडे, खरशेत, दलपतपूर, तोरंगण, चिरापाली, चिंचवड, जातेगाव तसेच दुर्गम भागात खरवळ, आडगाव (देवळा), गावठा, शिरसगाव, मुरंबी या गावांमध्ये नुकसान झाले.

नांदणी अज्ञातांकडून २४ मेंढरांची चोरी

शिरोळ : नांदणी (ता शिरोळ) येथील शितल निटवे यांच्या शेतात बसविण्यात आलेल्या ३२० मेंढरांपैकी एक लाख २३ हजार रुपये किमतीचे एकूण २४ मेंढरे अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची फिर्याद मेंढपाळ शिवाजी अण्णा जंगटे यांनी शिरोळ पोलीस ठाण्यात दिली आहे ही घटना सोमवारी रात्री घडली आहे

मेंढपाळ शिवाजी जंगटे व त्यांच्या सहकारी मेंढपाळांच्या मालकीची एकूण ३२० मेंढरे नांदणी येथील शितल निटवे यांच्या शेतात बसविण्यात आली होती सोमवार दिनांक १५ एप्रिल रोजी रात्री साडेसात वाजलेपासून ते मंगळवार दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजीच्या सकाळी साडेसात वाजण्याच्या मुदतीत अज्ञात चोरट्यानी काळे पांढरे व तांबूस अशा वेगवेगळ्या रंगाची २४ मेंढरे चोरून नेली आहेत

हातकणंगलेत आवाडेची तलवार झाली म्यान

कोल्हापूर : हातकणंगले लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे सहयोगी आमदार प्रकाश आवाडे यांनी आपली उमेदवारी माघार घेत महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या विरोधात पुकारलेले बंड थंड झाले असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या मध्यस्थीला यश आले आहे.

ताराराणी पक्षाकडून आमदार प्रकाश आवाडे यांनी लोकसभा लढवण्याची घोषणा केली होती. आवाडे हे लोकसभेच्या मैदानात उतरल्याने हातकणंगले मतदारसंघातील लढत पंचरंगी होणार होती. आमदार प्रकाश आवाडे यांनी निवडणुकीतून माघार

घेतल्याने विरोध मावळला आहे.

हातकणंगले मतदारसंघातील विद्यमान खासदार धैर्यशील माने यांच्या उमेदवारीला गेल्या महिनाभरापासून आवाडे व त्यांच्या कुटुंबीयांकडून उघड विरोध करत आवाडे यांचे पुत्र व माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल आवाडे यांनी सुरुवातीला स्वतःच लोकसभा लढणार, अशी घोषणा केली.

त्यासाठी त्यांनी शिवसेना ठाकरे गटाकडून लढण्याची तयारीही दर्शवली होती. पण, तत्पूर्वीच माने यांची महायुतीचे उमेदवार म्हणून घोषणा झाल्यानंतर राहुल हे शांत झाले होते. मात्र, अंतर्गत त्यांचा माने यांना असलेला विरोध कायम होता.

नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत राहुल आवाडे यांनीच आमदार प्रकाश आवाडे हे लोकसभेच्या रिंगणात उतरणार असल्याची घोषणा केली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी ताराराणी आघाडीच्या माध्यमातून रिंगणात उतरण्याची घोषणा त्यांनी केली होती. रविवारी (१४ एप्रिल) कोल्हापूरच्या दौऱ्यावर असलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही आवाडेंनी सहकुटुंब भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत राहुल आवाडे, त्यांच्या पत्नी मौसमी उपस्थित होत्या. बंद खोलीतील या चर्चेनंतरही आवाडे हे लढण्यावर ठाम होते. एवढेच नव्हे, तर ते आज मंगळवारी अर्जही भरणार होते. त्याची तयारीही त्यांनी केली होती.

रामनवमीनिमित्त मुक्तीधाम, काळाराम मंदिर परिसरात वाहतुकीवर निर्बंध

नाशिक : शहर परिसरात रामनवमीनिमित्त बुधवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नाशिकरोड येथे मुक्तीधाम परिसर आणि पंचवटीतील श्री काळाराम मंदिरात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन वाहतूक विभागाच्या वतीने मंदिर परिसरातील मार्गांवरील वाहतुकीवर निर्बंध आणण्यात आले आहेत.

रामनवमीनिमित्त पंचवटी येथील श्री काळाराम मंदिरात दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. मंदिराकडे सरदार चौकापासून जाणारा रस्ता अरूंद असल्याने या मार्गावर वाहतुकीची

वर्दळ धोकादायक ठरु शकते. हे लक्षात घेऊन भाविकांच्या सुरक्षेसाठी सरदार चौक ते काळाराम मंदिर रस्ता सकाळी सात ते रात्री १० या वेळेत सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहणार आहे. वाहनचालकांनी या काळात पर्यायी मार्गाचा अवलंब करावा, असे आवाहन वाहतूक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

नाशिकरोड परिसरात श्रीराम जन्मोत्सवानिमित्त मुक्तीधाम परिसरातून मिरवणूक काढण्यात येणार आहे. मुक्तीधाम मंदिर-बिटको चौक-छत्रपती शिवाजी महाराज चौक-डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक-रेल्वे स्थानक-सुभाष रोड-सत्कार पॉइंट-देवळाली गावमार्गे मुक्तीधाम असा मिरवणुकीचा मार्ग आहे. या मिरवणुकीत २० ते २५ हजार नागरिक सहभागी होण्याची शक्यता आहे. ही गर्दी पाहता वाहतुकीला अडथळा होऊ नये, यासाठी वाहतूक विभागाच्या वतीने वाहतूक मार्गात काही बदल करण्यात आले आहेत.

बुधवारी दुपारी तीन ते मिरवणूक संपेपर्यंत सत्कार पॉईंट ते बिटको सिग्नलकडे जाणारी मार्गिका वाहतुकीसाठी सर्व प्रकारच्या वाहनांना बंद राहील. रेल्वे स्थानकाकडून सत्कार पॉइंटकडे जाणारी मार्गिका सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद करण्यात येत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99